www.esakal.com
सकाळ
पिंपरी-चिंचवड, सोमवार, २५ जून २०१८

# एव्हरेस्टचा आनंद अवर्णनीय

## सौरज, समीर यांची भावना ; सात खंडांतील सर्वोच्च शिखराचे ध्येय

**पिंपरी, ता. २४ :** ''माउंट एव्हरेस्ट शिखर सर करण्यासाठी आम्ही यापूर्वीही दोन वेळा प्रयत्न केला होता. त्यामुळे आमच्या मनात भीती होती. परंतु, एव्हरेस्टच्या माथ्यावर पाऊल ठेवले. तेव्हा, आमच्या मनातील आनंद अवर्णनीय होता. आमचे पुढचे ध्येय जगातील सात खंडांतील सर्वोच्च शिखरे पादाक्रांत करण्याचे आहे,'' अशी भावना पुण्यातील गिर्यारोहक सौरज जिंगण आणि समीर पाथम यांनी शनिवारी व्यक्त केली.

आकुर्डी येथील फोर्स मोटर्स कंपनी पुरस्कृत माउंट एव्हरेस्ट मोहिमेत सौरज आणि समीर यांनी नेपाळच्या बाजूने म्हणजे दक्षिण दिशेने १८ मे रोजी सकाळी ६.१५ वाजता शिखरावर पाऊल ठेवले. त्याबद्दल कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक प्रसन्न फिरोदिया यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.



**आकुर्डी : जगातील सर्वोच्च माउंट एव्हरेस्ट शिखर सर केल्याबद्दल फोर्स मोटर्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक प्रसन्न फिरोदिया यांच्या हस्ते गिर्यारोहक (डावीकडून) सौरज जिंगण, समीर पाथम यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी आशुतोष खोसला उपस्थित होते.**

कंपनीचे विक्री आणि विपणन विभाग प्रमुख आशुतोष खोसला उपस्थित होते.

फिरोदिया म्हणाले, ''सौरज आणि समीर यांच्या कामगिरीचा आम्हाला अभिमान वाटतो. एव्हरेस्ट मोहीम धोकादायक आणि साहसी असते. परंतु, दोघांच्याही पत्नी व कुटुंबीयांनी त्यांना मोहिमेसाठी प्रोत्साहन दिले. दोघांनाही भविष्यातील मोहिमेसाठी शुभेच्छा.''

'सकाळ'शी बोलताना सौरज आणि समीर म्हणाले, ''आम्ही २०१५ मध्ये एव्हरेस्ट समीटचा प्रयत्न केला होता. परंतु, नेपाळमधील भूकंपामुळे आम्हाला मोहीम अर्धवट सोडावी लागली. त्यानंतर २०१७ मध्ये हिमवादळामुळे कॅम्प -४ येथे ३६ तास अडकून पडलो. तेव्हाही मोहीम सोडून द्यावी लागली. तिसऱ्या प्रयत्नात आम्ही मोहीम यशस्वी केली.''

दोघांनाही त्यांच्या पुढील मोहिमांसाठी फोर्स मोटर्सकडून एक्स्प्लोरर गाडी भेट देण्यात आली. या वेळी श्रीलंका दौऱ्यासाठी १९ वर्षांखालील भारतीय क्रिकेट संघात निवड झाल्याबद्दल पवन शाह याचाही सत्कार करण्यात आला. त्याचे वडील हुकूम शाह, आई राधिका या प्रसंगी उपस्थित होते.